स्थापना 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' २८ ऑगस्ट १९८९

१८ वा वार्षिक अहवाल सन २००६-२००७



सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ॥

"जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक"

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ

नोंदणी क्र. टी.एन्.ए./यू.एल.आर./आर.एस.आर.(सी.आर.)/३७४/१९८९-९०

प्रशासकीय कार्यालय : ३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१ ५०१.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

संचालक-मंडळ

श्री. हणमंत स. घनवट
अध्यक्ष

श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक - संचालक

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. [illegible]

श्री. शंकर जि. शेलवले
खजिनदार

श्री. प्रकाश शं. पवार
संचालक

श्री. प्रकाश शं. पाटील
संचालक

सौ. मंगला श्रीधर ढाले
संचालिका

श्री. भगवान अ. ऊतेकर
संचालक

श्री. मनोहर पां. जाधव
संचालक

सौ. निलम अ. आंब्रे
संचालिका

श्री. बाबुराव ना. साठे
संचालक

श्री. महादेव वि. थोरे
संचालक

श्री. हरीश्चंद्र य. येरूणकर
स्विकृत संचालक

सौ. प्रिती प्र. नलावडे
स्विकृत संचालिका

श्री. विजय अ. पाटील
सल्लागार

श्री. तुकाराम अं. शेडे
सल्लागार

१८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची **अठरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. ५-८-२००७ रोजी सकाळी ९.३० वा. महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ (प.)** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, हि विनंती.

सभेपुढील कामकाजाचे विषय

१) दि. ६/०८/२००६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) दि. ३१ मार्च २००७ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २००७-२००८ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
५) सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखा परिक्षकांची निवड करणे.
६) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरुस्त्यांना मंजूरी देणे. (सोबत उपविधी दुरुस्ती प्रकरण जोडले आहे.)
७) टिटवाळा येथे शाखा सुरु करणेबाबत विचारविनिमय करणे.
८) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने, आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

श्री. शशिकांत म. शिर्के
(सचिव)

दिनांक : १५-७-२००७

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ
(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

टिप

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर त्याच विषयांवर बोलविण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न दि. १.८.२००७ पूर्वी लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.
३) ज्या सभासदांनी सन २००३-०४ चा लाभांश घेतला नसल्यास घेणे अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.
४) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

१८ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या पतसंस्थेचा सन २००६-०७ या आर्थिक वर्षाचा अहवाल आणि ताळेबंद व नफा-तोटा पत्रके आपणांस सादर करताना मन अभिमानाने भरुन आले आहे. पतसंस्था प्रत्येक आर्थिक वर्षात नेत्रदिपक प्रगतीची उंच भरारी मारत आपल्या रौप्यमहोत्सवाकडे दिमाखदारपणे झेप घेत आहे. अशा वेळी काळाची बदलती पाऊले ओळखून आपल्याला परिवर्तनाचे वारे आत्मसात करावे लागणार आहेत.

समाजातील दीन-दुबळया तसेच अल्प उत्पन्न गटातील माणसाला अर्थसहाय्य करुन त्याचा सामाजिक स्तर उंचावण्याच्या उद्देशाने सहकाराची निर्मिती झाली. परंतु आजची सामाजिक-आर्थिक परिस्थीती तसेच जागतीक पातळीवर झपाट्याने होत असलेल्या आर्थिक बदलांमुळे शासनाच्या धोरणात अमूलाग्र बदल होत आहे. रिझर्व बँकेने बँकींग व्यवसायाला कठोर निर्बंध लागू केले आहेत. भविष्यात हे सारे निर्बंध पतसंस्थांनाही लागू होणार आहेत. त्याचा आरंभच एन. पी. ए. व एम्. आय. एस. प्रणालीच्या अंमलबजावणीने होत आहे. त्यातच खाजगी व विदेशी वित्तीय संस्थांनी हातपाय पसरायला सुरुवात केली आहे. अशा स्थितीत पतसंस्थेशी एकनिष्ठ व पारंपारिक ग्राहक टिकवून ठेवण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या या स्पर्धात्मक परिस्थीतीत आपणांस व्यावसायिकतेशी जूळवून घ्यावे लागणार आहे. आजच्या सामाजिक आर्थिक परिस्थीतीनुसार आपणास आपल्या कार्यप्रणालीची पूनर्रचना करावी लागणार आहे. त्यासाठी अभिनव व सेवाभावी उपक्रम राबवुन सक्षम ग्राहक मिळविण्याचा पुढील काळात आपला प्रयत्न राहील.

शाखा निहाय संपत्तीक स्थिती -

शाखा	भाग भांडवल	ठेवी	कर्जे	व्याज वसुल
अंबरनाथ	४४,२०,०४०.००	४,४४,७५,७६८.००	१८९,५२,७०५.००	२८,०८,७३२.००
बदलापूर	३१,८९,९६०.००	१,७६,४५,९८३.००	२५४,४३,७३१.००	३१,७२,०८४.००
डोंबिवली	९,४९,८१०.००	५८,९२,०७४.००	७०,०२,०९३.००	८,४२,३७०.००

आर्थिक वर्ष २००६-०७ आढावा -

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

रुपये लाखात

तपशील	२००५ - २००६	२००६ - २००७	% वाढ
अ) जबाबदाऱ्या			
१) भागभांडवल	६८.४१	८५.५९	२५.११ %
२) स्वनिधी	३१.६०	३५.८३	१३.३७ %
३) ठेवी	५१९.००	६८०.१३	३१.०४ %
४) निव्वळ नफा	७.७१	८.७३	१३.२६ %
ब) मालमत्ता			
१) कर्जे	४२३.५५	५१४.१८	२१.३९ %
२) गुंतवणुक	१७३.९८	२०८.५१	१९.८४%
३) कायम व इतर मालमत्ता	१९.३३	४५.८८	१३७.३५ %
क) उत्पन्न			
१) मिळालेले व्याज	६८.५७	८०.८३	१७.८७%
२) इतर उत्पन्न	१.१५	१.६६	४४.३४%
ड) खर्च			
१) दिलेली व्याजे	४१.८९	५८.२०	३८.९३%
२) सेवक पगार व भत्ता	५.९३	७.९९	३४.७३%
३) इतर खर्च	४.४७	५.०५	१२.९७%
४) तरतुदी	९.७६	२.५१	- ७४.२८%
इ) इतर बाबी			
१) प्रती सेवकामागे व्यवसाय	४४.१६	४९.७६	१२.६८ %
२) उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१०.५२	९.७५	- ०.७७ %
३) खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	७.८९	८.४२	६.७१%
४) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१.१६	१.०३	- ११.२० %

१) सभा -

अहवाल वर्षात आपल्या संचालक मंडळाच्या एकूण १२ सभा झाल्या. या सभांसाठी संचालकांची उपस्थिती व सहभाग उत्साहवर्धक होता. सर्व संचालक '''सहकारातील कार्यकर्ता' या नात्याने काम करतात हे मी अभिमानाने सांगू इच्छितो. संचालक सभांप्रमाणे कर्ज वसुली समिती, ठेव संकलन समिती यांच्या प्रत्येक महीन्याला शाखानिहाय सभा घेऊन कर्जवसुली व ठेव वृद्धीबाबत धोरणे आखली जातात. सर्व विषयांवर चर्चेअंती एकमताने निर्णय होतात. यामुळे एकोपा, समरसता आणि सलोखा या बाबी नेहमीच सांभाळल्या जातात.

२) सभासद संख्या व भागभांडवल -

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस एकूण २३९० सभासद होते. चालू आर्थिक वर्षात ३८४ नवीन सभासदांची वाढ झाली आणि १६० सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे वर्षाअखेरीस पतसंस्थेचे एकूण २६१४ सभासद आहेत.

पतसंस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. एक कोटी असून अहवाल वर्षात भाग-भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षाअखेर पतसंस्थेचे रु. ६८,४१,५७०.०० इतके वसूल भागभांडवल होते. अहवाल वर्षात रु. २२,९९,५३०.०० जमा झाले असून राजीनामा दिलेल्या सभासदांना रुपये ५८१,२९०.०० इतके भाग भांडवल परत केल्याने वर्षा अखेरिस पतसंस्थेकडे एकूण वसुल भागभांडवल रु.८५,५९,८१०.०० जमा झालेले आहे. भाग भांडवलामधील ही वृद्धी २५.११% एवढी आहे.

३) निधी -

अ) राखीव निधी - अहवाल सालाच्या सुरुवातीस राखीव निधीमध्ये रुपये १२,१८,७८९.०० जमा होते. सन ०६-०७ अखेरीस त्यात वाढ होऊन एकूण रुपये १४,५०,०५९.०० राखीव निधी जमा आहे.

ब) इतर निधी - सन २००६-२००७ मध्ये इतर निधी रु. २१,३३,७५५/- इतका जमा आहे.

४) ठेवी -

अहवाल वर्षातील पतसंस्थेचा वाढता व्यवसाय पाहता आपणा सर्वांचे आम्ही पतसंस्थेच्या वतीने जाहीर आभार मानतो. पतसंस्थेच्या सर्व सभासद व ठेवीदारांनी दिलेल्या उदंड प्रतिसादामुळे पतसंस्थेच्या ठेवींमध्ये ३१.०४ % नी वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण ठेवी रु. ६८०,१३,८२५/- इतक्या झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावा. ठेवींची विगतवारी पुढीलप्रमाणे -

ठेव योजनांचे नांव	ठेव रुपये
मुदत ठेव	३२३,१४,२७१.००
दामदुप्पट ठेव	५६,००,५४३.००
मासिक मिळकत ठेव	६४,१८,३३०.००
दैनंदिन ठेव	१८६,२१,६६६.००
मासिक ठेव	२४,९५,३९१.००
बालविकास ठेव	७१,०००.००
जनविकास ठेव	७,१३,८७४.००
लखपती ठेव	७,६०,२४६.००
इच्छापूर्ती ठेव	२३,९६६.००
पेंशन ठेव	१४,७५०.००
बचत ठेव	६६२,५२०.००
इतर ठेवी	३१७,२६८.००
एकुण ठेवी	६,८०,१३,८२५.००





५) कर्जवाटप - कर्जवसुली

सहकारी कायदा-नियम व पोटनियम यांस सुसंगत असे कर्ज धोरण संचालक मंडळाने स्विकारले आहे. त्यानुसार लघुउद्योग, छोटे-छोटे व्यापारी यांना जामीनकी कर्जे तसेच विविध प्रकारची तारण कर्जे दिली जातात. सभासदांच्या व ग्राहकांच्या एकूण आर्थिक परीस्थितीचा व कर्जपरत फेडीच्या क्षमतेचा अभ्यास करुन कर्जवाटप केले आहे. सन २००५-०६ अखेर रुपये ४,२३,५५,२१३.०० कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालात रु. ४,४५,६७,६३०.०० इतके कर्जवाटप झाले आहे. त्यापैकी रुपये ३,५५,०४,३१४.०० इतके कर्ज वसूल झाले आहे. त्यामुळे सन २००६-०७ अखेरीस रु. ५,१४,१८,५२९/- इतके कर्ज येणे बाकी आहे.

कर्जाची नियमित वसुली याचा उत्पन्नाशी थेट संबंध आहे. पतसंस्थेने वर्षाच्या सुरुवातीपासूनच अत्यंत गांभीर्याने या विषयाकडे लक्ष ठेवले आहे. सर्व प्रकारचे उपाय करुन सुद्धा वसुली न झाल्यामुळे संस्थेला नाईलाजाने काही थकीत कर्जदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर करवाई करावी लागत आहे. सहकारी कायद्यातील कलम ९१ व १०१ अंतर्गत दावे, मिळालेले वसुली दाखले व त्यांची कार्यवाही याचा सातत्याने पाठपुरावा केला जातो.

पतसंस्थेचे संचालक, वसुली समिती सदस्य काही वेळा कर्जदारांना तसेच जामिनदारांनाही प्रत्यक्ष बोलावतात. या भेटीमध्ये संबंधीतांना त्यांची कर्जविषयक जबाबदारीची जाणीव करुन देणे, परतफेडीच्या काही अडचणी असल्यास त्यावर मार्ग काढणे. परतफेड न झाल्यास त्यांचेविरुद्ध कारवाई होऊ शकते याची माहीती देणे. अशा पद्धतीने चर्चा होतात. शाखाधिकारी, वसुली अधिकारी हेही वसुलीसाठी गांभीर्याने प्रयत्न करीत असतात.

वसुलीच्या कारवाई अंतर्गत सन २००५-०६ मध्ये कलम १०१ अंतर्गत २४ वसूली दाखले मिळविले होते. त्यापैकी १६ वसुली दाखल्यांची रक्कम वसुल झाली आहे. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षात २१ वसुली दाखले मिळविले असुन त्यापैकी २ वसुली दाखल्यांची रक्कम वसुल झाली आहे. एकूण मिळालेल्या वसुली दाखल्यांपैकी २७ वसूली दाखल्यांची रक्कम वसुल करण्याचे वसुली अधिकाऱ्यांचे प्रयत्न चालू आहेत.

६) गुंतवणुक

अहवाल वर्षात सुरुवातीस राखीव निधी व मुदत ठेवीपोटी विविध बँकांमध्ये एकुण रु. १,७३,९८,४००/- गुंतवणुक केली होती. पतसंस्थेची आर्थिक स्थिती मजबूत राहण्याच्या दृष्टीने तसेच सहकार खात्याने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ठेवी व कर्जे यामध्ये तरलता साधण्याच्या दृष्टीकोनातून अहवाल सालात रु. ३४,५३,०००/- इतकी गुंतवणुक केली आहे. त्यामुळे पतसंस्थेची एकूण रु. २,०८,५१,४००.०० एवढी गुंतवणूक दि. ठाणे जि. मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को.ऑप.बँक.लि., महाराष्ट्र स्टेट को. ऑप.क्रेडीट सोसायटीज् डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन लि.

(डि.जी.सी.) व अन्य सह. बँकामधून (शेड्युल्ड) ठेवींद्वारे केली आहे.

७) नफा व नफा विभागणी

अहवाल वर्षात पतसंस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता **रु. ८,७३,१६६.१८ नफा** झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. ५७१.५० होता. म्हणजेच एकूण **नफा रु. ८,७३,७३७.६८** इतका झाला आहे. सहकार खाते यांच्या सुचना आणि नियमानुसार एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाने सुचविली आहे. त्यास मान्यता मिळावी अशी विनंती मी, संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांस करित आहे.

१)	राखीव निधी २५ %	रु.	२,१८,४३४.००
२)	लाभांश समीकरण निधी	रु.	२,५००.००
३)	धर्मदाय निधी	रु.	२,०००.००
४)	सभासद कल्याण निधी	रु.	८,०००.००
५)	रौप्य महोत्सव निधी	रु.	५,०००.००
६)	लाभांश ९.५ % प्रमाणे	रु.	६,३७,७००.००
७)	शिल्लक नफा	रु.	१०३.६८
	एकूण	**रु.**	**८,७३,७३७.६८**

८) विशेष उल्लेखनीय

सन २००६-०७ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाने पुढील दुरदृष्टी ओळखून आणि आपणा सर्वांचे सहकार्याने **पाचकलमी कार्यक्रम** आखला होता. आपणांस मी अभिमानाने सांगू इच्छितो की पतसंस्थेने आर्थिक व गुणात्मक विकासासाठी ही पंचसुत्री लिलया राबविली आहे.

१) या आर्थिक वर्षात प्रथमच जाहीर केल्याप्रमाणे पतसंस्थेने वडवली सेक्शन, अंबरनाथ येथे सुमारे १७५० चौ.फूट इतकी प्रशस्त जागा पतसंस्थेच्या प्रशासकीय कार्यालयाकरीता विकत घेतली आहे. तिचे सद्या नुतनीकरणाचे काम चालू आहे.

२) पतसंस्थेने सभासद कर्जदारांच्या मृत्युपश्चात त्यांच्या कुटूंबियांच्या हिताच्या दृष्टीने जनता वैयक्तीक अपघाती विमा योजना चालू केली आहे. या योजनेद्वारे कर्जदार सभासदाचा 'अपघाती विमा' उतरवल्याने आपल्या पतसंस्थेला मिळणाऱ्या भरपाई मधुन पतसंस्थेची कर्जवसूली करता येते व उरलेल्या रकमेद्वारे त्या सभासदांच्या कुटुंबियांस मदत होते.

३) पतसंस्थेने आपल्या ठेवीदारांच्या दृढ विश्वासास बळ देण्याच्या दृष्टीकोनातुन पतसंस्थेने डिपॉझिट गॅरंटी कॉर्पोरेशन (डी.जी.सी.) या महामंडळाचे सभासदत्व घेतले आहे. डी.जी.सी. पात्र सभासद पतसंस्थांच्या ठेवीदारांच्या ठेव रक्कमांना हमी देते. त्यामुळे आपल्या पतसंस्थेस याचा नक्कीच फायदा होईल.

४) आपणांस सांगण्यास आनंद होत आहे की, पतसंस्थेने आपली चौथी शाखा कल्याण (प.) येथे दि. ४/६/२००७ रोजी सुरु केली आहे. समाजातील दीन-दुबळ्या लोकांना, मदतीचा हात देण्यासाठी सहकाराच्यामाध्यमातून आपली पतसंस्था कार्य करीत असते. सभासदांच्या विश्वासास आपण नक्कीच पात्र होऊन यशाकडे अखंड झेप घेत राहू !

५) सहकारी क्षेत्रावर वाढत्या प्रतिबंधामुळे पतसंस्थेसमोर अडचणी व आव्हाने सतत वाढत आहेत. त्या आव्हानांना यशस्वीपणे तोंड देण्यासाठी गरज आहे, ती पतपेढीच्या विविध पातळयांवरील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्याची आणि प्रशिक्षणाची ! कर्मचाऱ्यांमधील गुणवत्ता विकास व क्षमतावर्धनासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आपल्या पतसंस्थेने कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ने आयोजित तीन दिवशीय प्रशिक्षण कार्यक्रमास पाठविले होते त्याचप्रमाणे, ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सह. पतसंस्था फेडरेशन लि. ने आयोजित चर्चासत्रे, शिबीरे यांना पतसंस्थेचा कर्मचारी वर्ग सातत्याने हजर असतो. त्यामुळे पतसंस्थेच्या दैनंदिन कांमाबरोबरच कर्मचाऱ्यांनी विविध व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केल्यास त्यातून स्वतःच्या विकासाबरोबर पतसंस्थेचाही विकास व्हावा याभुमिकेतून त्यांना विविध अभ्यागत, तज्ञ प्रशिक्षक यांद्वारे विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाते.

९) भावपूर्ण श्रद्धांजली -

अहवाल वर्षात देशातील जे राजकीय, सामाजिक, सहकार, कला व साहित्य क्षेत्रातील कार्यकर्ते तसेच संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतींस विनम्र अभिवादन.

श्रीमती आसराबाई आनंदा महांडूळे
माजी संचालिका

आपल्या पतसंस्थेच्या माजी संचालिका श्रीमती आसराबाई आनंदा महांडूळे यांचे दि. १७.०४.२००७ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले सन १९९६ ते १९९९ पर्यंत श्रीमती आसराबाई आ. महांडूळे या आपल्या पतसंस्थेवर संचालक पदी कार्यरत होत्या. त्यांच्या कार्याचा आपल्या पतसंस्थेला नेहमीच फायदा झाला आहे. त्यांनी पतसंस्थेला दिलेल्या योगदानाबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. त्यांच्या आकस्मित निधनामुळे पतसंस्थेने एक हसतमुख, सोज्वळ व उत्साही कार्यकर्त्या गमावल्या आहेत. त्यांच्या आत्म्यास चीरशांती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

१०) आभार -

आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या-ज्या व्यक्तिंनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल.

मा.श्री. मिलिंद नि. बोरीकर जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे व त्यांच्या कार्यालयातील मा.श्री.जी.बी. ठाकूर व इतर अधिकारी वर्ग, मा. श्री. प्रताप पाटील सहा. निबंधक सह. संस्था उल्हासनगर तालुका, मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. , मुंबई / ठाणे जिल्हा सह. बोर्ड लि. चे शिक्षण निधी वसुली अधिकारी श्री. एच. जी. शेटे साहेब, मा. श्री. व्ही. व्ही. देसाई मुख्याधिकारी प्रशिक्षण विभाग महा. राज्य सह. संघ. सहकार प्रशिक्षण केंद्र नाशिक चे प्राचार्य श्री. पी. के. कापडणीस, ठाणे जिल्हा नागरी/पगारदार सह. पतसंस्था फेडरेशनचे मा. अध्यक्ष, सचिव व पदाधिकारी तसेच विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार.

पतसंस्थेचे कायदेशीर सल्लागार ॲड. श्री. आर. एस. पालवे साहेब यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल जाहीर आभार मानतो. त्याचप्रमाणे मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरीषद, मा. श्री. सोनजे सर मुख्याध्यापक महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ, मा. श्री. रामराव मोरे सर मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय, तसेच पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यान्वित करणारे गुरु कन्सल्टंटचे संचालक श्री. संतोष परुळेकर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक., दि सारस्वत को. ऑप. बँक, डोंबिवली ना. सह. बँक, जनकल्याण सह. बँक ठाणे, अंबरनाथ जयहिंद को. ऑप .बँक, देना बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोबतपासनीस श्री. एस. एल. पाटील साहेब यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेचे कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचा प्रामाणिकपणा व अथक परीश्रमांतून ह्या संस्थेची भरभराट होत असल्याची जाणीव मी येथे खास नमुद करतो. पतसंस्थेचा उत्कर्ष असाच चालू रहावा ही सदिच्छा व्यक्त करुन मी हा अहवाल पूर्ण करतो.

जयहिंद ! जय सहकार !!



आपला
श्री. हणमंत सदाशिव घनवट
(अध्यक्ष)
श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

* बँकर्स *

- दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., अंबरनाथ
- अंबरनाथ जयहिंद को. ऑप. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- जनकल्याण को. ऑप. बँक लि., ठाणे
- दि सारस्वत को. ऑप. बँक लि., कल्याण-डोंबिवली
- देना बँक, डोंबिवली

* कायदेविषयक सल्लागार *

श्री. राजेंद्र एस्. पालवे B.Com., G.D.C.&A., LL.M. (Advocate High Court)

* कर्मचारी *

श्री. सुनिल हणमंत घनवट
श्री. नाथा बाबुराव लोटके
श्री. सुबोध कृष्णा भोसले
कु. संयोगिता अनंत आंब्रे
श्री. प्रकाश हरिश्चंद्र व्यापारी
सौ. स्वाती कैलास बोरकर
श्री. आनंदा विठ्ठल पाटील G.D.C. & A.
सौ. मधुरा महेश दाबके
सौ. अनिता प्रदिप भोसले
श्री. सुशील एस्. जामसंडेकर
सौ. मेघा समीर मिरकुटे
श्री. कल्पेश ए. भोईर
श्री. पाडुरंग श्रीपती पाटील
श्री. विनोद दादाजीराव कदम
श्री. संतोष श्रीपती पाटील
श्री. सचिन महादेव मोर्ये
सौ. रश्मी रा. विचारे

* कार्यालयीन वेळ *

अंबरनाथ कार्यालय	:	मंगळवार ते रविवार सकाळी ९.०० ते १२.०० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.
बदलापूर शाखा	:	मंगळवार ते रविवार स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.
डोंबिवली शाखा	:	मंगळवार ते रविवार स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.
कल्याण शाखा	:	मंगळवार ते रविवार स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.

ताळेबंद

रक्कम रु. २००५-०६	जबाबदाऱ्या व देणे		रक्कम रु. २००६-०७
९,००,००,०००.००	**अधिकृत भाग भांडवल**		९००,००,०००.००
६८,४९,५७०.००	वसुल भाग भांडवल		८५,५९,८९०.००
११,८३,५२१.००	**राखीव निधी**	१४,११,५३८.००	
४,६४०.००	प्रवेश फी	३,८००.००	
१७,९३०.००	नाममात्र सभासद फी	१६,७५०.००	
१२,६९८.००	लाभांश वर्ग	१८,००७.००	१४,५०,०९५.००
१९,४९,९२३.००	**इतर निधी**		
५,५४,४६५.००	इमारत निधी	६,९३,८१५.००	
३१,१९७.००	लाभांश समीकरण निधी	३३,११७.००	
२५,६१५.००	सभासद कल्याण निधी	२८,६१५.००	
४२,०००.००	रौप्य महोत्सव निधी	४७,०००.००	
१८,२१३.००	धर्मदाय निधी	९,२१३.००	
१२,७०,४३३.००	संशयीत व बुडीत कर्ज निधी	१३,२१,९१५.००	२१,३३,७५५.००
५,१९,००,६५३.००	**ठेवी**		
२,३५,६२,००५.००	मुदत ठेव	३,२३,१४,२७१.००	
५६,३९,५७६.००	दामदुप्पट ठेव	५६,००,५४३.००	
५४,१६,०००.००	मासिक मिळकत ठेव	६४,१८,३३०.००	
१,३३,७९,०६४.००	दैनंदिन ठेव	१,८६,२१,६६६.००	
२३,४१,१७१.००	मासिक ठेव	२४,९५,३११.००	
६१,०००.००	बालविकास ठेव	७१,०००.००	
३,६६,८५०.००	जनविकास ठेव	७,१३,८७४.००	
२,२३,५८१.००	लखपती ठेव	७,६०,२४६.००	
७,१७,८७२.००	बचत ठेव	६,६२,५२०.००	
---	इच्छा पूर्ती	२३,९६६.००	
१,९३,५३४.००	इतर ठेवी	३,१७,२६८.००	
---	पेंशन ठेव योजना	१४,७५०.००	६,८०,९३,८२५.००
३५,७९,९१०.००	**देणी व तरतुदी**		
३१,४२,७७५.००	देणे ठेवीवरील व्याज	२९,७०,३१६.००	
४०,०००.००	देणे ऑडीट फी	५०,०००.००	
५,०००.००	शिक्षण निधी	५,०००.००	
---	शाखा उद्घाटन तरतुद	३०,०००.००	
६३,०५३.००	देणे कर्मचारी बोनस	८२,९९३.००	
८१,८३८.००	देणे कर्मचारी भविष्य नि. निधी	१,५१,८७२.००	
३,४३५.००	देणे व्याज कर्मचारी भविष्य नि. निधी	११,८८६.००	
२५,७७२.००	देणे अनामत	५३,३७६.००	
---	देणे टी.डी.एस.	६,९६०.००	
२,१८,०३७.००	देणे लाभांश	२,००,६८५.००	३५,६३,०८८.००
७,७१,४१०.५०	**नफा**		
४१५.००	शिल्लक नफा (सन ०५-०६)	५७१.५०	
७,७०,९९५.५०	चालू नफा (सन ०६-०७)	८,७३,१६६.१८	८,७३,७३७.६८
६,६२,५४,२५५.५०	**एकूण**		८,४५,९४,३१०.६८

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. शंकर जी. शेलवले
खजिनदार

पत्रक (३१.३.२००७ अखेर)

रक्कम रु. २००५-०६	संपत्ती व येणे		रक्कम रु. २००६-०७
१८,२४,७३२.००	**रोख शिल्लक**		१६,३८,८६९.००
२६,१६,६७२.५०	**बँक शिल्लक**		५८,०३,१४०.६८
१,७३,९८,४००.००	**गुंतवणूक**		२,०८,५१,४००.००
४,२३,५५,२१३.००	**कर्ज**		
२,५०,७५,१७३.००	मध्यम मुदत कर्ज	३,३६,३७,४८४.००	
२७,६२,४७६.००	दैनंदिन ठेव कर्ज	२५,४८,६५७.००	
४९,४२,०४४.००	मुदत ठेव तारण कर्ज	४१,०५,०८९.००	
५,६६,५६७.००	एन.एस.सी.तारण कर्ज	२,४३,२५०.००	
७,७३,९६०.००	वस्तू खरेदी तारण कर्ज	७,४३,०७१.००	
२३,५७,५३८.००	सोने तारण कर्ज	२९,०५,१९१.००	
२१,१४,३७४.००	गृह तारण कर्ज	३५,४७,८०२.००	
९,६०,६३५.००	वाहन तारण कर्ज	११,८६,४४२.००	
८,५००.००	मालतारण कर्ज	२,७००.००	
२५,१७,२७६.००	नाममात्र सभासद कर्ज	२१,२०,३६०.००	
२,७६,६७०.००	व्यवसाय कर्ज	१,३५,०००.००	
---	तातडी कर्ज	२,४३,४८३.००	५,१४,१८,५२९.००
६,५३,९०१.००	**स्थावर मालमत्ता** (इमारत)	६,५३,९०१.००	
	चालू खरेदी	+ २४,५०,७५०.००	
	झीज	- ५७,१९२.००	३०,४७,४५९.००
४,२६,५९८.००	**फर्निचर व डेडस्टॉक**	४,२६,५९८.००	
	चालू खरेदी	+ ३,७०,७२४.००	
	झीज	- ७१,७५८.००	७,२५,५६४.००
१,०४,९३०.००	**संगणक प्रणाली**	१,०४,९३०.००	
	चालू खरेदी	+ ३,९३५.००	
	झीज	- ३५,९२५.००	७२,९४०.००
५,०२,०००.००	कार्यालय डिपॉझिट		४,६६,०००.००
६,०००.००	टेलिफोन अनामत		९,०००.००
३७०.००	वीज अनामत		८७०.००
९,७३०.००	अधेसिव्ह स्टॅम्प		१६,९३०.००
९०,६८०.००	येणे ॲडव्हान्स		९८,२६३.००
२४,८७९.००	येणे १०१ कारवाई खर्च		३५,२१२.००
---	येणे सभासद विमा		९१,८६२.००
२,४०,१५०.००	स्टेशनरी साठा		२,६६,७९०.००
---	येणे डी. जी. सी. लाभांश		१३,३००.००
---	येणे बँक व्याज		३८,१८२.००
६,६२,५४,२५५.५०	**एकुण**		८,४५,९४,३१०.६८

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. हणमंत स. घनवट
अध्यक्ष

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००६ ते ३१/३/२००७ अखेर

रक्कम रुपये २००५-०६	खर्च		रक्कम रुपये २००६-०७
	अ) व्याज खर्च		
३४,०५,३१६.००	१) ठेवीवरील व्याज	४७,३५,६१८.००	
३,६१०.५०	२) बँक चार्जेस	१३,७७०.६५	
७,८०,५५५.००	३) दैनंदिन ठेव कमिशन	१०,७१,२६१.००	५८,२०,६४९.६५
	ब) व्यवस्थापकीय खर्च (ब-१)		
५,०४,४२२.००	१) सेवक पगार	६,६१,६७३.००	
१,३००.००	२) सहकार प्रशिक्षण खर्च	२०,०२०.००	
५०.००	३) महाराष्ट्र राज्य सह.पत.फे.प्र.फी	१,०५०.००	६,८२,७४३.००
	ब) -२		
२०,५८४.००	१) पोस्टेज टेलीग्राम	१२,७५१.००	
९,५९९.००	२) स्थावर मालमत्ता विमा खर्च	८,६६५.००	
४३,२५०.००	३) कार्यालय भाडे	५२,६५०.००	
२,१५५.००	४) संगणक देखभाल दुरुस्ती	२,२००.००	
३९,३८०.००	५) वीज बील	४५,५५६.००	
३९,०८९.००	६) टेलीफोन बिल	४५,१२८.००	
---	७) सेवा शुल्क	१३,२८८.००	१,८०,२३८.००
	ब) - ३		
९,०००.००	१) अंतर्गत लेखा परिक्षण फी	९,०००.००	
४३,२५८.००	२) शासकिय लेखा परिक्षण फी	५३,३५५.००	
७,८३५.००	३) टॅक्स ऑडीट फी	८,४१८.००	७०,७७३.००
	ब) - ४ घसारा खर्च		
१६,७६७.००	१) स्थावर मालमत्ता	५७,१९२.००	
४७,४००.००	२) फर्निचर व फिक्चर	७१,७५८.००	
३३,४५६.००	३) संगणक	३५,९२५.००	१,६४,८७५.००
५०,०७,०२६.५०	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		६९,१९,२७८.६५

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. शंकर जी. शेलवले
खजिनदार

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००६ ते ३१/३/२००७ अखेर

रक्कम रुपये २००५-०६	उत्पन्न		रक्कम रुपये २००६-०७
	क) मिळालेले व्याज		
५६,५२,१५०.००	१) कर्ज व्याज वसुल	६८,२३,१८६.००	
१२,०५,६८१.००	२) बँक गुंतवणूक व्याज	१२,०८,७१०.८३	
---	३) येणे लाभांश डि.जी.सी.	१३,३००.००	
---	४) येणे बँक व्याज	३८,१८२.००	
१५.००	५) बँक लाभांश	१५.००	८०,८३,३९३.८३
	ख) इतर उत्पन्न		
६०,७५५.००	१) नोटीस फी	९०,५६३.००	
४८,९५५.००	२) प्रोसेसिंग फी	७६,२३२.००	
५,५२१.००	३) सेवा शुल्क	---	१,६६,७९५.००
६९,७३,०७७.००	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		८२,५०,१८८.८३

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. हणमंत स. घनवट
अध्यक्ष

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००६ ते ३१/३/२००७ अखेर

रक्कम रुपये २००५-०६	खर्च बाजू		रक्कम रुपये २००६-०७
५०,०७,०२६.५०	मागील पानावरुन		६९,१९,२७८.६५
	फ) जाहीरात व देणगी खर्च		
६,६६१.००	१) सामाजिक उपक्रम	६८३.००	
१४,३९६.००	२) जाहीरात खर्च	८४७४.००	
---	३) सहकार शताब्दी संयोजन समिती	५,०००.००	१४१५७.००
	ड) इतर खर्च		
७,९५०.००	१) मासिक सभा भत्ता	८,०००.००	
३५,२८५.००	२) वार्षिक सभा (अहवाल छपाई)	५३,६०४.००	
३,०००.००	३) सचिव मानधन	३,०००.००	
१६,९००.००	४) निवडणूक खर्च	-------	
१,६००.००	५) फेड. वर्गणी	-------	
१२,९७१.००	६) आपात्कालीन खर्च	-------	
१०,२००.००	७) पुरग्रस्त मदत	-------	
२५,०६०.००	८) ठेव संकलन सप्ताह	-------	६४,६०४.००
	ड) - २		
३५,९२०.००	१) किरकोळ खर्च	५७,४६८.००	
२६,५३६.००	२) प्रवास खर्च	५६,४८१.००	१,१३,९४९.००
	ड) -३		
६,९०८.००	१) दसरा, लक्ष्मी पूजन खर्च	१५,८७६.००	
२४,७२४.००	२) ऑफीस मेंटनेन्स खर्च	३७,४६२.००	
---	३) गुमास्ता परवाना फी	७,२००.००	६०,५३८.००
	ड) तरतुदी		
२५,८१८.००	१) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी	३४,५६३.००	
२,०००.००	२) कर्मचारी भविष्य नि.नि.व्याज	८,४५१.००	
६०,४४१.००	३) सानुग्रह अनुदान	७५,०००.००	
५,०००.००	४) शिक्षण निधी	५,०००.००	
८,७३,६८५.००	५) संशयित व बुडीत कर्ज निधी	५१,४८२.००	
---	६) शाखा उद्घाटन	३०,०००.००	२,०४,४९६.००
७,७०,९९५.५०	**ई) नफा**		
	निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग	८,७३,१६६.१८	८,७३,९६६.१८
६९,७३,०७७.००	**एकूण**		८२,५०,९८८.८३

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. शंकर जी. शेलवले
खजिनदार

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००६ ते ३१/३/२००७ अखेर

रक्कम रुपये २००५-०६	उत्पन्न	रक्कम रुपये २००६-०७
६९,७३,०७७.००	मागील पानावरुन	८२,५०,१८८.८३
६९,७३,०७७.००	**एकूण**	८२,५०,१८८.८३

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. हणमंत स. घनवट
अध्यक्ष

अंदाज पत्रक

सन २००७ - २००८

उत्पन्न	रक्कम रुपये	खर्च	रक्कम रुपये
कर्जावरील व्याज वसूल	७६,१२,०००.००	किरकोळ खर्च	६०,०००.००
बँक व्याज	१४,००,०००.००	प्रवास खर्च	६४,०००.००
नोटीस फी	९५,०००.००	संचालक भत्ता	७,९५०.००
बँक लाभांश	१५.००	विमा खाते	३५,०००.००
सेवा शुल्क / प्रो. चार्जेस	७५,०००.००	छ. ले. सा.	२,५०,०००.००
		कर्मचारी वेतन	७,२०,०००.००
		जाहीरात खर्च	२५,०००.०
		टेलिफोन खर्च	५०,०००.००
		दै. ठेव कमिशन	१४,००,०००.००
		ऑ. मेंटनंस खर्च	४०,०००.००
		वीज बील	६०,०००.००
		कार्यालय भाडे	६०,०००.००
		वकील फी	५,०००.००
		पोस्टेज	१७,०००.००
		दसरा / लक्ष्मीपूजन खर्च	१८,०००.००
		सानुग्रह अनुदान	८०,०००.००
		वा. सा. सभाखर्च	६०,०००.००
		शिक्षण निधी	५,०००.००
		अं.हि.त. मानधन	९,०००.००
		ऑडीट फी	५०,०००.००
		टॅक्स ऑडीट फी	१०,०००.००
		सचिव मानधन	३,०००.००
		सहकार प्रशिक्षण खर्च	२५,०००.००
		मालमत्ता कर	२०,०००.००
		देणे ठेवीवरील व्याज	५१,०८,९५०.००
		शाखा उद्घाटन खर्च	३०,०००.००
		अपेक्षित नफा	९,६९,११५.००
एकूण	९१,८२,०१५.००	एकूण	९१,८२,०१५.००

श्री. शशिकांत म. शिर्के	श्री. शंकर जी. शेलवले	श्री. अविनाश ना. खानविलकर	श्री. हणमंत स. घनवट
सचिव	खजिनदार	उपाध्यक्ष	अध्यक्ष

उपविधी दुरुस्तीचा नमुना

पोटनियम	सध्याचा पोटनियम	पोटनियम दुरुस्ती	दुरुस्तीचे कारण
क १.३ अ संस्थेचे अधिकृत भागभांडवल	संस्थेचे अधिकृत भाग भांडवल (अंकी) रु. १००,००,०००/- (अक्षरी रु. एक कोटी मात्र) असेल प्रत्येकी भागाची दर्शनी किंमत रु. १००/- राहील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास १०० भाग धारण करता येईल.	संस्थेचे अधिकृत भाग भांडवल (अंकी) रु. २००,००,०००/- (अक्षरी रु. दोन कोटी मात्र) असेल प्रत्येकी भागाची दर्शनी किंमत रु. १००/- राहील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास १०० भाग धारण करता येईल.	सद्याची अधिकृत भाग भांडवल मर्यादा संपत आल्याने
परिशिष्ट क - २ तारणी कर्ज २: क स्थावर तारण कर्ज (गृहबांधणी कर्ज)	स्थावर तारण, कर्ज रकमेच्या दुप्पट किंमतीचे असले पाहिजे जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. २५ लाखापर्यंत राहील. यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	स्थावर तारण, कर्ज रकमेच्या सव्वापट किंमतीचे असले पाहिजे जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असू नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. २५ लाखापर्यंत राहील. यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	सभासदांच्या मागणीवरुन.
परिशिष्ट क - २ तारणी कर्ज २: ऊ सोने-चांदी	सोने-चांदी, दागदागिने किंमतीच्या ५०% पर्यंत आणि दागदागिने तारण कर्ज जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असून नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	सोने-चांदी, दागदागिने किंमतीच्या ७०% पर्यंत आणि दागदागिने तारण कर्ज जास्तीत जास्त कर्ज मर्यादा संस्थेच्या स्वनिधीच्या २०% पेक्षा जास्त असून नये आणि जास्तीत जास्त कमाल कर्ज मर्यादा रु. १० लाखापर्यंत यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम.	सभासदांच्या मागणीवरुन.

अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २००६-२००७ च्या तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : १ जून २००७

सही /-

श्री. एस्. एल. पाटील
बी. कॉम., जी.डी.सी. ॲण्ड ए.
शासकीय प्रमाणित लेखा परीक्षक,
सह. संस्था, कोकणभवन, नवी मुंबई.

शासकीय लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५ ब)
आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम १९६९ अन्वये द्यावयचा)

मी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेला ३१-३-२००६ या दिनांकाचा ताळेबंद व सन २००५-२००६ या सहाकरी वर्षाचे नफा/तोटा पत्र तसापले असून अहवाल करीतो की,

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाशाचे आधारे
(अ) ताळेबंद व नफा / तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळते असून सदर ३१.३.२००६ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याचे/तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य त्या रितीने ठेवलेली आहेत.

४) सन २००५-२००६ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

सही/-
योगेश पी. पाटील सी.ए.
शासकीय प्रमाणित लेखापरिक्षक,
सहकारी संस्था, कोकणभवन, नवी मुंबई.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : ०९-०७-२००६

※ सभासदांसाठी सूचना ※

१) आपला पत्ता बदलला असल्यास नविन पत्ता पूर्ण तपशीलासह संस्थेस कळवावा.

२) आपल्या वारसदारांची नोंद संस्थेच्या कार्यालयात वेळीच करून घेण्यात यावी.

३) आपला शिल्लक लाभांश संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावा.

४) आपली बचत, दैनंदिन,आवर्त,मुदत ठेव, खाती संस्थेत उघडून सहकार्य करावे.

५) आपल्या कर्जाची थकबाकी होणार नाही यांची काळजी घ्यावी.

६) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी १२ वी व पदवी परिक्षा प्रथम प्रयत्नात पास झालेल्या मुलांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रमाण पत्राच्या प्रतीसह दि. ०१.०८.०७ पुर्वी नोंदणे आवश्यक आहे.

७) दर सोमवारी संस्थेचे कार्यालय बंद राहील.

८) एखाद्या महिन्यात जर कार्यालयीन रजा १५ तारखेस असेल तर त्या महिन्याची १६ तारीख ही हप्ता भरण्याची अखेरची तारीख असेल.

हार्दिक शुभेच्छा

※ दैनंदिन / मासिक ठेव प्रतिनिधी ※

अंबरनाथ शाखा :

सौ.निवेदिता विलास शिंदे	✆: ३२४३३७६
श्री.हरिष देवजी चिकणे	✆: २६००५३६
सौ. माधुरी मनोहर जाधव	✆: ९४२३०८८४६५
श्री.बापूराव भिमराव मेश्राम	मो. : ९८२२५१०३२२
श्री.युवराज नागराज जैन	✆: ६५६०३९७
श्री. बाळू रामदास पाटील	मो. : ९४२३३६७३१६
सौ. सुष्मा हरिश्चंद्र येरूणकर	✆: २६०१५९५
कु. योगिता सहदेव कडू	मो. : ९४२२०७८२५८
श्री.अजित अशोक मांढरे	मो. : ९८२००९५६२४
सौ.संजीवनी गणेश भारंबे	✆: २६०३९६२
श्री. विश्वास तुकाराम शेंडे	---------
श्री. मिनाक्षी अशोक थोरात	---------
श्री. प्रदिप शंकर भोसले	मो. ९३२५४१३६८६
सौ. मिना यादव भोर	---------

कल्याण शाखा :

सौ. ललिता बाळू पाटील	मो. ९४२३३६७३१६
कु. प्रसाद सुरेश एखंडे	मो. ९२२४५६४३०१
सौ. किरण महादेव थोरे	मो. ९३७११८९७९३
श्री. सुनिल भागोजी सावंत	मो. ९३२४८७२९४४
श्री. शिवाजी शामराव देशमुख	मो. ९३२४९८२७४९

बदलापूर शाखा :

सौ.स्नेहल जगदीश मोरे	मो. : ९४२३३६७५२२
सौ.गितांजली जयवंत पाटील	---------
श्री. मलकान नथू पवार	मो. : ९३२४३२०३७७
श्री.विरेंद्र बबन जगदाळे	मो. : ९८५०१७०९५७
सौ. स्वाती कैलास पाटील	मो. : ९२२६७४९२८०
श्री. शिवप्रसाद गुप्ता	मो. : ९३२६०५२६३५
श्री. सुभाष अरूण देशमुख	मो. : ९८२२४४७१८६
श्री. अरुण ओंकार पाटील	मो. : ९३२४०६४३८७
श्री. जयप्रकाश पाटील	मो. : ९९६००२३९७१
सौ. रुपाली चं. देसाई	✆: २६७१३४४
श्री. धोंडीराम शं. पाटील	मो. ९३२३५६७४१३

डोंबिवली शाखा :

सौ. रजनी आ. धायगुडे	मो. ९८९२६५४६९३
श्री. विलास शांताराम बेलोसे	----------
सौ. मनिषा बाळू म्हात्रे	✆: ६४१४४६३
श्री. रघुनाथ धोंडू चौगुले	मो. ९३२२८९४६४७
श्री. प्रकाश जगन्नाथ सुर्वे	✆: २४०४८०३
सौ. उषा भास्कर दाबके	✆: २८८१५२८
सौ. श्रद्धा विश्वास शिंदे	✆: ५३६१४४६
श्री. संजय अंकुश पाटील	----------
श्री. नितीन जगन्नाथ कदम	मो. ९३२४०११४४७

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

दि. ४-६-२००७ : कल्याण शाखेचे उद्घाटन समयी मा. श्री. प्रताप पाटील (सहा. निबंधक सह. संस्था, उल्हासनगर) सोबत संस्थेचे संस्थापक मा. श्री. जयवंतराव काटकर, मा. श्री. प्रभाकर नलावडे (माजी नगराध्यक्ष अं.न.प.)

दि. ४-१०-२००६ : प्रशासकीय कार्यालय नूतनीकरण समारंभासमयी उपस्थित संचालकांना मार्गदर्शन करताना मा. श्री. बाळासाहेब सोनजे सर



श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

आकर्षक ठेव योजना !

दरमहा नियमित १,३५७/- रु. भरा आणि लक्षाधिश व्हा !

दामदुप्पट ठेव - ८१ महिने (६ वर्षे ९ महिने)

महालक्ष्मी मुदत ठेव

४५ दिवस ते १८० दिवस	-	०६.०० %
१८१ दिवस ते ३६४ दिवस	-	०८.०० %
१ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षे	-	१०.५० %
२ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षे	-	१०.०० %
३ वर्षापेक्षा जास्त ते ५ वर्षे	-	०९.५० %

महालक्ष्मी मासिक मिळकत ठेव

१ वर्ष	-	१०.०० %
२ वर्ष	-	१०.५० %
३ वर्ष	-	११.०० %

महालक्ष्मी मासिक ठेव

१ वर्ष	-	०७.५० %
२ वर्ष	-	०८.०० %
३ वर्ष	-	०८.५० %

महालक्ष्मी जनविकास ठेव

१ वर्ष	-	०९.०० %
२ वर्ष	-	०९.५० %
३ वर्ष	-	१०.०० %

महालक्ष्मी बाल विकास ठेव

६१ महिने	-	०९.०० %
७३ महिने	-	०९.५० %
७ वर्षे	-	१०.०० %
८ वर्षे	-	११.०० %
९ वर्षे	-	११.५० %
१० वर्षे	-	१२.०० %

दैनंदिन ठेव : १ वर्ष - ५ %   ६ महिने - ४ %

❋ **अंबरनाथ शाखा -**
३०४६, इंदिरा गांधी चौक,
महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पू.)
फोन : २६०९७९०/२६११२५४

❋ **बदलापूर शाखा -** सोनल कॉटेज,
आंबामाता मंदिरासमोर, महावीरनगर,
बदलापूर (प.) फोन : २६७१४१९.

❋ **डोंबिवली शाखा -**
६, चिंतामणी को.ऑ.हौ.सो., दिनदयाळ तिसरा क्रॉस रोड,
डोंबिवली (प.) फोन : ३२०५५०२.

❋ **कल्याण शाखा -** अन्नपुर्णा को.ऑप. हौ. सोसायटी,
पहीला माळा, रिलायन्स वेबवल्ड समोर,
कल्याण-मुरबाड रोड, सिंडीकेट, कल्याण (प.)
फोन : २३२८५९३.

प्रेषक -
श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या., अंबरनाथ
३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर,
अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१ ५०१.
फोन : अंबरनाथ - २६०९७९० / २६११२५४.

प्रति -
श्री./सौ. ____________________
____
____